॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

=================================================================

# संलग्नता विभाग

=================================================================

दि. २९/०६/२०१७

**विषय :- कौशल्य विकास महाविद्यालयांचा शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० बृहत आराखडयात समावेशा बाबत..**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ तसेच नवीन शैक्षणिक धोरणान्वये विद्यापीठाने शासनाकडे सादर केलेला बृहत आराखडयात कौशल्य विकास अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांचा समावेश करण्याकरीता प्राप्त आदेशान्वये दि. २१ जून २०१७ रोजी दुपारी ०२.३० वाजता सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेत निश्चित झाल्याप्रमाणे उमविशी संलग्नित तीनही जिल्हयात कौशल्य विकास महाविद्यालयांचा समावेश करणे बाबत समाजाच्या सर्व घटकांकडून अभिप्राय/मते /सूचना १० जुलै २०१७ पर्यत मागवून वर्तमानपत्रात त्याबाबत प्रसिध्दी देण्याबाबत समितीने सूचविलेले असून व त्यास मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता देखील प्रदान केलेली आहे. करीता खालील मजकूर जळगाव, धुळे, नंदूरबार या तीनही जिल्हयातील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याच्या मान्यतेस सादर.

***"आजच्या जागतिकीकरण व संगणीकरणाच्या काळात उमवि अधिक्षेत्रातील जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हयातील युवक/युवतींना चारित्र्यसंपन्न व प्रगल्भ नागरिक बनविणेसाठी तसेच त्यांचे उद्याचे आर्थिक व व्यावसायिक जीवन संपन्नमय व प्रगतीशील होण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रातील सेवारहित व न्यूनविकसित क्षेत्रांच्या गरजांचा योग्य तो विचार करुन उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वसमावेशक, समन्यायी वाटप होण्याच्या दृष्टीने आणि विद्यापीठाचा व पर्यायाने राष्ट्राचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातून युवक/युवतींना अधिक दर्जेदार,गुणवत्तापूर्ण तसेच व्यवसायभिमूक उच्च शिक्षण देणे ही काळाची गरज आहे.***

***आजचे शिक्षण, उच्च शिक्षणाप्रती असलेल्या अपेक्षा भविष्यात लागणा-या सेवांकरीता मनुष्यबळ वर्ग कशाप्रकारचे असावे आदि बाबी तसेच जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हयातील भौगोलिक परिस्थितींचा अभ्यास करुन, विद्यापीठ परिक्षेत्रात कोणकोणते नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरु करणे अपेक्षित असल्याने विद्यापीठाने खालीलप्रमाणे जिल्हानिहाय कौशल्य विकास महाविद्यालयांचे स्थाने व संख्या निश्चित केलेली आहे."***

## जळगाव जिल्हा- एकूण १३

| अ.क्र. | कौशल्य विकास महाविद्यालयांसाठी नियोजीत स्थान | कौशल्य विकास महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | जळगाव | ०४ |
| ०२ | भुसावळ | ०१ |
| ०३ | रावेर आणि यावल यांच्यासाठी | ०१ |
| ०४ | मुक्ताईनगर, बोदवड आणि वरणगाव यांच्यासाठी | ०१ |
| ०५ | जामनेर | ०१ |
| ०६ | पाचोरा आणि भडगाव यांच्यासाठी | ०१ |
| ०७ | चाळीसगाव | ०१ |
| ०८ | पारोळा आणि एरंडोल यांच्यासाठी | ०१ |
| ०९ | अमळनेर | ०१ |
| १० | धरणगाव आणि चोपडा यांच्यासाठी | ०१ |

## धुळे जिल्हा- एकूण ०७

| अ.क्र. | कौशल्य विकास महाविद्यालयांसाठी नियोजीत स्थान | कौशल्य विकास महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | धुळे | ०२ |
| ०२ | अवधान | ०१ |
| ०३ | नरडाणा | ०१ |
| ०४ | शिरपूर | ०१ |
| ०५ | शिंदखेड आणि दोडाईचा यांच्यासाठी | ०१ |
| ०६ | साक्री आणि पिंपळनेर यांच्यासाठी | ०१ |

**नंदूरबार जिल्हा- एकूण ०५**

| अ.क्र. | कौशल्य विकास महाविद्यालयांसाठी नियोजीत स्थान | कौशल्य विकास महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | नंदूरबार | ०१ |
| ०२ | शहादा | ०१ |
| ०३ | तळोदा आणि अक्कलकुंवा यांच्यासाठी | ०१ |
| ०४ | नवापूर | ०१ |
| ०५ | धडगाव आणि मोलगी यांच्यासाठी | ०१ |

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० या दोन वर्षाच्या कालावधीसाठी तयार करण्यात आलेल्या बृहत आराखडयाच्या भाग-१ मध्ये उपरोक्त नमूद कौशल्य विकास महाविद्यालये व त्यांची स्थाने निश्चित केली असल्याने, आपणाकडून अभिप्राय/मते/सूचना मागविण्यात येत असून, समाजातील विविध घटक : पालक, विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालक, शिक्षणतज्ञ, उद्योजक , समाजसुधारक इ. नी आपल्या सूचना

affiliation.nmu@gmail.com या मेल आयडी वर दि. १० जुलै २०१७ पर्यत पाठवाव्यात ही विनंती.

**Sd/-**
**विशेष कार्य अधिकारी**
**संलग्नता विभाग**